# जाहीर सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, मंडल कार्यालय, लातूर, साळे गल्ली,जुने पावर हाऊस,लातूर या आस्थापनेवर सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, लातूर यांच्या सर्वेक्षण अहवालानुसार सन २०२५-२६ करिता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवार यांच्या विजतंत्री **६६ तारतंत्री ६६ असे एकुण १३२** जागा भरण्यासाठी विजतंत्री / तारतंत्री या व्यवसायात आय. टी.आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी **दिनांक २०.०५.२०२५ ते दिनांक ०२.०६.२०२५ रात्री १२:०० वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर विभागनिहाय पुढीलप्रमाणे ऑनलाईन अर्ज हे त्यांना आवश्यक असलेल्या विभागानुसार करण्यात यावेत.**

**विभागनिहाय आस्थापना क्रमांक खालीलप्रमाणे आहेत:-**

१) लातूर विभागासाठी आस्थापना क्रमांक. - E12192700110

२) उदगीर विभागासाठी आस्थापना क्रमांक. - E01172700737

३) निलंगा विभागासाठी आस्थापना क्रमांक. - E01172700753

**एका उमेदवाराने एकाच विभागासाठी अर्ज करावा.** दिनांक ०२.०६.२०२५ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. टिप :- अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक ०२.०६.२०२५ रोजी रात्री १२:०० पर्यंतची राहील. उमेदवाराने www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.

**सदर भरती ही फक्त लातूर जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असुन इतर जिल्हयातील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची **उदा:- (शैक्षणिक प्रमाणपत्र -आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवाशी दाखला इत्यादी.)** छायांकित प्रती साक्षांकीत करून दिनांक ०२.०६.२०२५ पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय लातूर,साळे गल्ली,जुने पावर हाऊस, लातूर येथे स्वत: प्रत्यक्ष सादर करावीत. तसेच शैक्षणिक व इतर कागदपत्रांची छायांकित प्रती साक्षांकीत करून सादर न करणा-या उमेदवाराच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्रशिक्षण कालावधी हा एक वर्षाचा राहील. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत शासन नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**PRO LTR No.70**
**Dt.15/05/2025**

अधिक्षक अभियंता
महावितरण, मंडल कार्यालय, लातूर.